# "गीतानुभव"

जगामध्ये मानवाच्या कल्याणासाठी गीते शिवाय कोणताही दुसरा ग्रंथ नाही. चराचराने वंदन केलेल्या परमपुरुषोत्तम साक्षात भगवान श्रीकृष्णाची दिव्य वाणी आहे. हा एक अत्यंत रहस्यपूर्ण ग्रंथ आहे. भगवंताचे गुण, प्रभाव आणि मर्म यांचे वर्णन ज्याप्रकारे गीतेत केले आहे तसे इतर कुठेही सापडणे कठीण आहे. श्रीवेदव्यासांनी महाभारतात म्हटले आहे- गीता सुगीता करण्याजोगी आहे याचा अर्थ हा की गीतेचे उत्तम प्रकारे चिंतन मनन करून वाचन करावे व तिचा अर्थ आणि भाव अंतःकरणात साठवावे. स्वतः श्रीभगवान कृष्णानेही गीतेचे महत्त्व सांगितले आहे.

गीतेतील पंधराव्या अध्यायाचे महत्त्व:-

परब्रह्माच्या मायेतून उत्पन्न होणाऱ्या संसारवृक्षाचे अश्वत्थाच्या उदाहरणाने आपण जाणून घेऊ या.

'अ' म्हणजे नाही 'श्व' म्हणजे उद्या 'त्थ' म्हणजे टिकणारा. जो उद्या आपल्याला आजच्या सारखा दिसणार नाही तो, जो सतत बदलत राहतो तो। हे विश्व, संसार अश्वत्थ आहे गतिमान; याचा 'आदी' नाही 'अन्त' नाही तसेच त्याची उत्तम प्रकारे स्थिरताही नाही.

हा संसाररूपी अश्वत्थ कसा आहे- ह्या वृक्षाची मुळे वर आणि तो खाली वाढत जातो आदिपुरुष परमेश्वररूपी मूळ असलेल्या, ब्रह्मदेवरूप फांदी असलेल्या, वेद ज्याची पाने आहेत त्या संसाररूप वृक्षाला जो जाणतो तो वेदांनाही जाणतो

आता ह्या संसाररूपी अश्वत्थवृक्षाचे उन्मूलन कसे करता येईल?->

पिंपळाचा वृक्ष असा कोणी लावलेला दिसत नाही तो पक्ष्यांच्या विष्ठेतून, बियांतून आपोआप उगवतो तसाच हा संसार वृक्ष आहे याचे मूळ बीज दिसत नाही, ते जाणावे लागते. मायेने उत्पन्न होते आणि आपल्याला मूळ स्वरूपाचा विसर पडतो.

अश्वत्थ वृक्षाचे हे बदलते रूप (ज्याप्रमाणे पानगळ झाली की निष्पर्ण भासत दिसणारा, नविन लहलहर पालवी फुटल्यावर आणि हिरव्या गर्द पानांनी बहरलेला.) आणि क्षणभंगुरत्व हेच त्याचे सौंदर्य आहे त्यामुळे सृष्टी सदैव ताजी टवटवीत आहे मानवी जीवन व्यवस्था नित्यनूतन आहे.

पहिल्या अध्यायात विषादाशी जोडला गेलेला अर्जुन आता शेवटी विषाद टाळून पुरुषोत्तमाशी जोडला गेला आहे. अर्जुनाला गीता सांगतांना सर्व मनुष्यमात्रांना श्रीकृष्णांनी ज्ञान, संन्यास, कर्म, भक्ती, ध्यान, सांख्य असे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करून दिले अपेक्षा हिच की यापैकी कुठल्याही मार्गाने त्यांनी पुरुषोत्तम योग साधावा आणि हेच मानवी जीवनाचे परमश्रेय आहे. आपुले देह बुद्धिचे लघुत्व टाकून ज्ञानमार्ग वैराग्य अंगी बाणवून ब्रम्हांडस्वरूप होण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे हाच पुरुषोत्तम योगाचा खरा अर्थ आहे हेच मानवी जीवनाचे सार्थक आहे.

देव म्हणजे उत्तम पुरुष देऊळ म्हणजे अक्षरपुरुष आणि परिवार म्हणजे क्षर पुरुष हे तिन्ही पुरुष अंतिमत: एकच आहेत आणि म्हणुन हा परिपूर्ण पुरुषोत्तम योग आहे.

॥ ॐ श्री कृष्णार्पणमस्तु ॥



सौ प्रज्ञा राजेंद्रकर
नागपुर
mob: 9665093890.